दूरध्वनी क्र. 0712-2220750
फॅक्स क्र. 0712-2225694
Email-dirgeomin.mah@rediffmail.com

पत्र क्र. एमएलआर/१८७७/२०१२ /१९६०
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, २७, खनिज भवन,
१ ला माळा, सिमेंट रोड, शिवाजी नगर,
नागपूर-४४००१०
दिनांक - 6 JUL 2015

प्रति,
अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,
कोल्हापूर

विषय :- लॅटेराईट खनिजाचा गौण खनिज म्हणून खाणपट्टा मंजूरीबाबत.

संदर्भ :-
१) जिल्हाधिकारी कार्यालय, खनिज विभाग, कोल्हापूर पत्र क्र. कार्या/६अ/आर आर/१२४९/२०१५ दिनांक २५/०५/२०१५.
२) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन ( विकास व विनियमन ) नियम, २०१३.
३) केंद्र शासन, खाण मंत्रालय, याची अधिसूचना दिनांक १०/०२/२०१५.
४) संचालनालयाचे शासनास सादर केलेले पत्र क्र. एसटीसी/गौण खनिज/८९५/२०१५/७१३ दिनांक ५ मार्च, २०१५.

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणांस कळविणेत येते की, संचालनालयाद्वारे ता. शाहुवाडी येथील मौजा- घुंगुर गट क्र. ६८५, क्षेत्र ३०८.४७ हे. आर., मौजा परळी येथील गट क्र. २२३, मधील एकूण २६२.४२ हे., मौजे परखंदळे येथील गट क्र. ५७२ ते ५७५ मधील एकूण ११९.७८ हे, मौजे आंबर्डे येथील गट क्र. ९२१ मधील एकूण ८९.६१ हे. असलेल्या आवेदित क्षेत्रावर कार्यसत्र २००७-२००८ ते २००९-२०१० दरम्यान पूर्वेक्षणाचे काम करण्यात आलेले आहे. सदर पूर्वेक्षणाचे अहवालाप्रमाणे उपरोक्त अर्जित क्षेत्रांवर १ ते २१ बोरहोल्स चे नमुने घेण्यात आले. सदर क्षेत्रांचा Geological map यासोबत सादर करण्यात येत आहे. ( जोडपत्र-१) सदर २१ बोरहोल्सचे नमुन्यांचे रासायनिक पृथःकरण अहवालाप्रमाणे उपरोक्त क्षेत्रात लॅटेराईट बॉक्साईट / ॲल्युमिनियस लॅटेराईट या खनिजाचा आढळ असल्याचे निदर्शनास येते. ( रासायनिक पृथःकरण अहवालाचे विवरण सोबत सादर करण्यात येत आहे. ) अर्जदारांनी मागणी केलेल्या मौजा-घुंगरू, परळी, परखंदळे, व आंबर्डे या गावातील ९०.०० हे. क्षेत्र लॅटेराईट खाणपट्ट्यासाठी उपलब्ध होऊ शकेल. त्युनसार मौजा घुंगुर गट क्र. ६८५ मधील एकूण ३०८.४७ हे. आर पैकी २५.०० हे., मौजा-परळी गट क्र. २२३ मधील एकूण २६२.४२ हे. पैकी २०.०० हे. क्षेत्र, परखंदळ येथील गट क्र. ५७२ ते

५७५ मधील एकूण क्षेत्र ११९.७८ हे. पैकी २५.०० हे. तसेच आंबर्डे येथील गट क्र. ९२१ मधील एकूण ८९.६१ हे. क्षेत्रापैकी २०.०० हे. क्षेत्र लॅटेराईट खनिजासाठी उपलब्ध होऊ शकेल. सबब संलग्नित नकाशात दर्शविल्याप्रमाणे बॉक्साईट खनिजाचा आढळ असलेले क्षेत्र वगळता इतर क्षेत्रात लॅटेराईट गौण खनिज खाणपट्टा संदर्भांकित अधिसूचना क्र. ३ नुसार मंजूर करण्यास हरकत नसावी. तथापि या परिसरात बॉक्साईट या प्रमुख खनिजाचे उत्खनन होणार नाही याबाबत दक्षता घेणे आवश्यक राहील.

उपसंचालक, प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर यांनी आवेदित क्षेत्राच्या नकाशा सादर केला आहे. त्यानुसार देखिल मौजा घुंगुर, परळी परखंदळे आणि अंबर्डे या क्षेत्रावर लॅटेराईट खनिजाचा आढळ असल्याचे निदर्शनास येते. ( प्रत संलग्नित )

केंद्रशासन खाण मंत्रालय यांची अधिसूचना दिनांक १०/०२/२०१२ नुसार लॅटेराईट खनिजाचा समावेश गौण खनिज प्रवर्गात करण्यात आलेला आहे. संचालनालयाचे संदर्भिय दिनांक ५ मार्च, २०१५ चे पत्रान्वये अधिसूचनेतील नमूद ३१ खनिजांपैकी १) कोरंडम २) डोलोमाईट ३) लॅटेराईट ४) पायरोफिलाईट ५) क्वार्टझ ६) क्वार्टझाईट आणि ७) सिलिका सॅण्ड या खनिजांची राज्यातील उपलब्धता, दर्जा तसेच विविध उद्योगात सदर उच्चप्रतीचे खनिजांची इ. बाबी विचारात घेता सदर खनिजे ' वर्गीकृत गौण खनिजे ' म्हणून निर्धारित करणेबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही करणेस विनंती केलेली आहे. तथापि वरील संदर्भात शासनाकडून दिशानिर्देश प्राप्त झालेले नाहीत.

आपले संदर्भिय पत्र दिनांक २५/०५/२०१५ नुसार आवेदित क्षेत्रात लॅटेराईट खनिजाचा आढळ दिसून येत असल्यामुळे व केंद्रशानाचे दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ चे अधिसूचनेप्रमाणे सदर खनिज गौण खनिज म्हणून घोषित झाल्यामुळे महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन ) नियम २०१३ प्रमाणे पुढील कार्यवाही करता येईल.

कृपया अवलोकनार्थ व पुढील यथोचित कार्यवाहीस सादर.

आपला,

<u>सहपत्रे -</u> वरिलप्रमाणे.

(सही)

संचालकांकरिता,
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, नागपूर.

(मा. संचालकांनी मान्य केलेले प्रारूप)

# ANNEXURE – IV

## Analytical Results of Samples of Boreholes
## (GR-1 to GR-21)

## Cemical Analysis Result

**B.H.No. GR-17**

| Sr. No. | Sample No. | Run (m.) | | $AL_2O_3$ % | $Fe_2O_3$ % | $TiO_2$ % | $SiO_2$ % | LOI % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | From | To | | | | | |
| 1 | GR 17/1 | 0.00 | 1.00 | 22.15 | 19.16 | 1.59 | 38.28 | 17.60 |
| 2 | GR 17/2 | 1.00 | 2.00 | 28.57 | 28.74 | 2.59 | 22.73 | 17.21 |
| 3 | GR 17/3 | 2.00 | 3.00 | 33.57 | 30.34 | 3.07 | 13.37 | 21.72 |
| 4 | GR 17/4 | 3.00 | 4.00 | 27.93 | 41.52 | 3.25 | 10.77 | 16.44 |
| 5 | GR 17/5 | 4.00 | 5.00 | 22.26 | 50.30 | 2.54 | 11.53 | 13.24 |
| 6 | GR 17/6 | 5.00 | 6.00 | 22.56 | 44.71 | 2.93 | 15.05 | 14.69 |
| 7 | GR 17/7 | 6.00 | 7.00 | 26.42 | 46.31 | 2.67 | 13.93 | 10.48 |
| 8 | GR 17/8 | 7.00 | 8.00 | 14.73 | 56.69 | 2.38 | 16.26 | 8.83 |
| 9 | GR 17/9 | 8.00 | 9.00 | 24.56 | 27.94 | 1.70 | 29.32 | 16.46 |
| 10 | GR17/10 | 9.00 | 10.00 | 19.06 | 50.30 | 1.74 | 19.27 | 9.49 |

## Cemical Analysis Result

**B.H.No. GR-18**

| Sr. No. | Sample No. | Run (m.) | | $AL_2O_3$ % | $Fe_2O_3$ % | $TiO_2$ % | $SiO_2$ % | LOI % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | From | To | | | | | |
| 1 | GR 18/1 | 0.00 | 1.00 | 31.32 | 27.89 | 1.14 | 24.35 | 14.76 |
| 2 | GR 18/2 | 1.00 | 2.00 | 31.47 | 26.30 | 1.23 | 26.39 | 14.02 |
| 3 | GR 18/3 | 2.00 | 3.00 | 32.16 | 23.91 | 1.38 | 27.81 | 14.15 |
| 4 | GR 18/4 | 3.00 | 4.00 | 31.81 | 22.71 | 1.38 | 29.95 | 13.75 |
| 5 | GR 18/5 | 4.00 | 5.00 | 30.18 | 24.30 | 1.52 | 30.33 | 12.99 |
| 6 | GR 18/6 | 5.00 | 6.00 | 28.62 | 28.29 | 1.39 | 28.43 | 12.82 |
| 7 | GR 18/7 | 6.00 | 7.00 | 30.69 | 26.30 | 1.71 | 26.91 | 13.81 |
| 8 | GR 18/8 | 7.00 | 8.00 | 26.65 | 43.03 | 2.12 | 13.65 | 13.97 |
| 9 | GR 18/9 | 8.00 | 9.00 | 33.27 | 35.86 | 2.72 | 10.28 | 17.39 |
| 10 | GR18/10 | 9.00 | 10.00 | 29.12 | 37.45 | 2.18 | 15.92 | 14.82 |